|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

"A" Grade
NAAC Re-Accredited
(4th Cycle)



विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/११ए/VCSPS/३६५/२०२६ दिनांक :-१०/१०/२०२६

प्रति,
कबचौउमविशी संलग्नित असलेलल्या सर्व महाविद्यालयांचे मा.प्राचार्य.

विषय :- **"कुलगुरु विज्ञान प्रात्यक्षिक कौशल्य वृध्दी योजना" (V.C.Science Practical Scheme)** लागू करणेबाबत..

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषगांने आपणास विदित करण्यात येते की, विद्यापीठाने अर्थसंकल्प सन.२०२६-२७ मध्ये नव्याने समाविष्ठ करण्यात आलेल्या कुलगुरु विज्ञान प्रात्यक्षिक कौशल्य वृध्दी योजनेची मार्गदर्शक तत्वे तयार केलेले असून विस्तृत स्वरुपाची नियमावली,कार्यक्रम अहवाल विहित नमूने सोबत जोडलेले आहे.ज्या महाविद्यालयांमध्ये विज्ञान विद्याशाखा आहे अशा महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या कक्ष अधिकारी,विकास विभागाकडे मार्गदर्शक तत्वे (SOP) नुसार प्रस्ताव सादर करावेत, आपल्याकडून प्राप्त होणा-या प्रस्तावांचा उपलब्ध निधीनुसार मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल,ही विनंती.

**कळावे,**

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**
विकास विभाग

प्रत सविनय सादर:-

१. मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय,कबचौउमवि.,जळगांव.
२. मा.प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय,कबचौउमवि.,जळगांव.
३. मा.अधिष्ठाता/प्र.अधिष्ठाता/प्र.सहयोगी अधिष्ठाता.यांना.
४. मा.वित्त व लेखाधिकारी,कबचौउमवि.,जळगांव.



# कुलगुरु विज्ञान प्रात्यक्षिक कौशल्य वृध्दी योजना
## मार्गदर्शक तत्वे (Sop)

प्रस्तावना :-

*विज्ञान शाखा प्रात्यक्षिकाधारित असल्याने विज्ञान शाखेच्या अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक कार्याचे महत्व निर्विवाद आहे. प्रात्यक्षिक कार्यामुळे विदयार्थ्यांच्या धारणा दृढ होतात. सैदधांतिक ज्ञानाचा प्रत्यय प्रात्यक्षिकांमधूनच येत असल्याने विदयार्थ्यांचा अध्यापन अनुभव भक्कम होतो. मुलभूत अशा वैज्ञानिक संकल्पना पूर्णपणे लक्षात येऊन मुलभूत विज्ञानाची समज वृध्दींगत होते. ही बाबत नवीन राष्ट्रीय धोरणाने (NEP 2020) लक्षात घेऊन उच्च शिक्षणामध्ये अध्यापन अनुभवाधारित कौशल्याधारित, प्रात्यक्षिक केंद्रित अध्यापनअनुभांवर भर दिलेला आहे. या नव शै.धोरणाच्या अंमलबजावणीत मात्र उपरोक्त प्रात्यक्षिक कार्याच्या अंगाने काही अडचणींचा सामना करावा लागतो. यात प्रामुख्याने पुरेशा प्रमाणात शिक्षक नसणे, एकाच शिक्षकावर अनेक वर्गांच्या प्रात्यक्षिकांची जबाबदारी असणे, प्रात्यिक्षिकांचे पुरेसे तास वेळापत्रकात बसविता न येणे यासारख्या , अडचणींचा समावेश आहे. यामुळे उच्चशिक्षणातील प्रात्यक्षिक कार्य अपेक्षित परिणाम साध्या करू शकत नाही. अभ्यासक्रमातील सर्वच प्रात्यक्षिके अपेक्षित क्षमतेने, अपेक्षित दर्जानूसार होत नाहीत. यामुळे विदयार्थी वर्ग प्रात्यक्षिकातून प्राप्त होऊ शकणाऱ्या ज्ञानापासून वंचित राहतो. ही अडचण लक्षात घेउन विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनसाठी कुलगुरु प्रात्यक्षिक सहाय्य योजना कार्यक्रम विदयापीठाने पुरस्कृत केलेला आहे.*

मार्गदर्शक तत्वे :-

1. *अभ्यासक्रमातील सर्व प्रात्यक्षिके पूर्ण करणे या उदिदष्टाच्या पूर्तीसाठी जेथे शिक्षकांची कमतरता आहे तेथे बाहेरील तज्ञ प्राध्यापकांची तात्पुरत्या स्वरूपाची, विहित कालमर्यादेची नेमणूक करणे.*
2. *प्रात्यक्षिक कार्य पुर्ततेसाठी सेवानिवृत्त प्राध्यापकांची मर्यादित तासांसाठी नेमणूक करता येईल.*
3. *ही योजना फक्त विज्ञान शाखेतील प्रात्यक्षिकांसाठीच मर्यादित आहे.*
4. *ज्या महाविदयालयात पुरेसे शिक्षक नाहीत अथवा अनुभवी शिक्षक नाहीत त्या महाविदयालयांसाठीच ही योजना आहे.*
5. *विज्ञान शाखेतील विविध विषयांच्या अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिकांसाठी बाहेरील तज्ञ शिक्षक नियुक्त करता येतील.*
6. *उर्वरित प्रात्यक्षिके नियमित प्राध्यापकांनीच पार पाडावयाची आहेत.*
7. *बाहेरील तज्ञ प्राध्यापकांकडून करून घ्यावयाच्या प्रात्यक्षिकांसाठी एक आठवडयाचे (सहा दिवसाचे) सत्र आयोजित करावे. पूर्वसत्रात बाहेरील तज्ञाकडून संबंधीत प्रात्यक्षिकांचे स्वरूप*

8. पूर्वतयारी -लेखनकार्य इ. बाबत मार्गदर्शन केले जाईल. त्यानंतर प्रत्यक्ष प्रात्यक्षिक बाहेरील तज्ञ हे विदयार्थ्यांकडून करून घेतील. त्यांना प्रात्यक्षिकाचा अनुभव देतील.

9. मार्गदर्शनपर सत्र ऑफलाईन असेल.सकाळ व दुपार सत्रात प्रात्यक्षिकाचे सत्र आयोजित करावे

10. प्रात्यक्षिके व प्रात्यक्षिकपूर्व मार्गदर्शन सत्र या साठीचे तज्ञ हे सेवानिवृत्त अथवा सेवेतील विषय तज्ञ/ अनुभवी व्यक्ती असतील.

11. विदयापीठातर्फे स्वतंत्र कुलगुरु प्रात्यक्षिक सहाय्य योजना समिती स्थापन करण्यात येऊन ही योजना राबविण्यात येईल.

12. बाहेरील तज्ञ व्यक्तींची, अनुभवी व्यक्तींची निवड उपरोक्त समितीव्दारे करण्यात येईल. महाविदयालयांची निवड देखील छाननी अंती समिती करेल.

13. एका प्रात्यक्षिक सत्रासाठी मानधन रूपये 1000/- असेल. मानधनासह प्रवासखर्च विदयापीठ देईल. निवास,भोजन या साठीचा खर्च महाविदयालयाने करावयाचा आहे.

14. एका महाविदयालयातील विज्ञान शाखेतील किमान दोनच विभागांना(विषयांना) प्रात्यक्षिक कौशल्यवृध्दी योजना एका शै.वर्षासाठी मंजूर करण्यात येईल. या योजनेसाठी एका महाविदयालयाला टोकन ग्रँट (लाक्षणिक अनुदान) रू.20000/- देण्यात येतील.

15. सदर कुलगुरु प्रात्यक्षिक सहाय्य योजनेचा लाभ ज्या महाविदयालयातील विदयार्थी संख्या 1000 च्या आत आहे, शिवाय जे महाविदयालय निमशहरी, ग्रामीण, आदिवासी विभागात मोडते त्यांनाच घेता येईल.

16. उपरोक्त निकषात बसणाऱ्या महाविदयालयांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव 30 जुलै पूर्वी विदयापीठाकडे पाठवावेत. (सहाय्यक कुलसचिव, विकास विभाग क.ब.चौ. उ.म.वि. जळगाव)

17. प्रस्तावात विषय -प्रात्यक्षिकाचे शीर्षक -कार्यरत शिक्षक संख्या – विदयार्थी संख्या नमूद कराव्यात.

18. प्रात्यक्षिके आटोपल्यानंतर 30 मार्चपूर्वी अहवाल-उपस्थितीपत्रक- छायाचित्रे – बिले-फीड बॅक फॉर्म सादर करणे बंधनकारक राहील.

वरील योजना राबविल्या नंतर महाविद्यालयाने विद्यापीठात अहवाल सदर करणे अनिवार्य असेल.

योजना सुरु करताना प्रथम वर्षी १५ महाविद्यालयांना प्रायोगिक तत्वावर हि योजना मंजूर करण्यात येईल.



# कुलगुरु विज्ञान प्रात्यक्षिक कौशल्य वृध्दी योजना

**विहित नमुना अर्ज**

१. महाविद्यालयाचे नाव :-

२. कोणत्या शैक्षणिक वर्षासाठी अर्ज करीत आहात ? :-

३. विषयाचे नाव / विभागाचे नाव :-

४. प्रात्यक्षिकाचे शीर्षक :- १--------------------------------

२--------------------------------

५. कार्यरत शिक्षक संख्या (विभागातील)

अ. कायम शिक्षक :-

ब. कंत्राटी शिक्षक :-

क. तासिका तत्वावर शिक्षक :-

६. विद्यार्थी संख्या :-

७. महाविद्यालयाचा भोगोलिक स्तर – शहरी / निमशहरी / ग्रामीण / डोंगराळ / आदिवासी क्षेत्र

८. विभागासाठी नियुक्त प्राध्यापकेतर कर्मचारी संख्या :-

अ. प्रयोगशाळा सहायक :-

ब. प्रयोगशाळा परिचर :-

क. शिपाई / मदतनीस :-

९.आपल्या महाविदयालयात एकुण किती प्रयोगशाळा आहेत ? ------------------------------

१०.पैकी किती प्रयोगशाळा संशोधन केंद्र म्हणून मान्यता प्राप्त आहेत ?------------------------

११. प्रस्तुत योजना आपल्या महाविदयालयास मिळावी असे वाटण्याची कारणे :-

१.

२.

३.

**प्राचार्य**

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
## Kavayitri Bahinabai Chaudhari
## North Maharashtra University, Jalgaon
**‘A’ Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)**



**कुलगुरु विज्ञान प्रात्यक्षिक कौशल्य वृध्दी योजना**

**कार्यक्रम अहवाल नमुना (Report Format)**

**विद्यापीठ-पुरस्कृत कार्यक्रम :**

**१) कार्यक्रमाचे शीर्षक (Title)**

विज्ञान प्रात्यक्षिक सहाय्य योजना कार्यक्रम

**२) आयोजक संस्था (Organizing Institution)**

महाविद्यालयाचे नाव : ________________________

विद्यापीठ : ________________________

विभाग : विज्ञान विभाग / विद्यार्थी विकास विभाग

स्थळ : ________________________

**३) दिनांक व कालावधी (Date & Duration)**

दिनांक : ____ / ____ / ______

कालावधी : १ दिवस / २ दिवस / बहुदिवसीय

**४) कार्यक्रमाचा उद्देश (Objectives)**

विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक सहाय्य योजना प्रशिक्षण देणे

संशोधन वृत्ती विकसित करणे

ग्रामीण/आदिवासी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे

NEP-२०२० नुसार कौशल्याधारित शिक्षण देणे

बाहेरील तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे

**५) सहभाग (Participation Details)**

घटक

संख्या

विद्यार्थी संख्या

———

शिक्षक संख्या

———

उपस्थित प्राध्यापक

———

विभाग / महाविद्यालये

———

**६) तज्ञ प्राध्यापकांचे तपशील (Expert Details)**

नाव

संस्था

विषय

सत्र

———

———

**७) कार्यक्रमाची रूपरेषा (Programme Schedule)**

उद्घाटन सत्र

तज्ञ मार्गदर्शन सत्र – १

प्रात्यक्षिक / प्रयोग प्रशिक्षण

तज्ञ मार्गदर्शन सत्र – २

विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक सादरीकरण

प्रश्नोत्तर सत्र

समारोप व प्रमाणपत्र वितरण

**८) कार्यक्रमातील प्रमुख उपक्रम (Key Activities)**

प्रयोगशाळा प्रात्यक्षिके

उपकरण हाताळणी प्रशिक्षण

संशोधन प्रकल्प मार्गदर्शन

मॉडेल/पोस्टर सादरीकरण

विद्यार्थ्यांचे संवाद सत्र

**९) आर्थिक वापर अहवाल (Financial Utilization Report)**

| बाब | मंजूर रक्कम ₹ | वापरलेली रक्कम ₹ |
|---|---|---|
| मानधन | | |
| प्रवास | | |
| साहित्य | | |
| एकूण | | |

**१०) छायाचित्रे (Photographic Evidence)**

(येथे कार्यक्रमातील ३–५ फोटो जोडावेत)

उद्घाटन सत्र

प्रात्यक्षिक सत्र

गट चर्चा / संशोधन कार्य

प्रमाणपत्र वितरण

**११) विद्यार्थ्यांचा अभिप्राय (Student Feedback Summary)**

कार्यक्रम अत्यंत उपयुक्त वाटला – ______% विद्यार्थी

प्रात्यक्षिक कौशल्य वाढले – ______%

संशोधनाची आवड निर्माण झाली – ______%

(संक्षिप्त ३–४ ओळींचा सारांश)

**१२) तज्ञ प्राध्यापकांचा अभिप्राय (Expert Feedback)**

विद्यार्थ्यांचा सहभाग समाधानकारक / उत्कृष्ट

प्रात्यक्षिक कौशल्य सुधारण्याची गरज

अशा कार्यक्रमांची नियमित आवश्यकता

**१३) परिणाम (Outcomes)**

विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक कौशल्य वाढले

संशोधन दृष्टिकोन विकसित झाला

ग्रामीण विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग वाढला

विद्यापीठाच्या उद्दिष्टांशी सुसंगत परिणाम साध्य

**१४) अडचणी (if any)**

उपकरणांची मर्यादा

वेळेची मर्यादा

विद्यार्थ्यांची मोठी संख्या

**१५) निष्कर्ष (Conclusion)**

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व संशोधन कौशल्य विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरला असून भविष्यात अशा उपक्रमांचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

**१६) स्वाक्षरी (Signatures)**

कार्यक्रम समन्वयक : _____________

विभाग प्रमुख : _____________

प्राचार्य : _____________

दिनांक : _____________